वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, यांचे कार्यालय अकोला

जावक क्रमांक/ १०७५ /२०२६
वित्त विभाग, जिल्हा न्यायालय,अकोला.
दिनांक: ११/०३/२०२६

...दरपत्रक (निवीदा) मागविण्याबाबत...

प्रति,

सेकेतस्थळ.
जिल्हा न्यायालय, अकोला.

विषय :— जिल्हा न्यायालय, अकोला येथील ६५ डेझर्ट कुलर्स व १२ सिम्फनी कुलर्सची दुरूस्ती करणेबाबत दरपत्रक (निवीदा) सादर करणे बाबत....

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आदेशान्वये आपणांस कळविण्यात येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला येथील कार्यरत न्यायालय/विभागात तसेच कार्यरत न्यायीक अधिकारी यांच्या शासकीय निवासस्थांनावर डेझर्ट कुलर्स लावण्यांत आलेले आहेत. साधारणत: ६५ डेझर्ट कुलर्स व १२ सिम्फनी कुलर्सची ची सर्व्हिसींग, वुडवूल/गवत भरणे, डेझर्ट कुलर्सना प्रायमर आवश्यकता असल्यास कलरींग करणे, ऑईलिंग ग्रीसींग, आवश्यकता असल्यास वेल्डींग करणे, नविन टप घेणे इत्यादी किरकोळ दुरूस्तीची कामे करण्याकरिता दरपत्रक (निवीदा) खालील अटीं व शर्तीवर बोलाविण्यात येत आहेत.

१. जिल्हा न्यायालय व मुख्यालयीस्थित अधिनस्त न्यायालये व विभागांमध्ये व कार्यरत न्यायीक अधिकारी यांच्या शासकीय निवास्थानावर लावण्यात आलेल्या सर्व डेझर्ट कुलर्सची व सिम्फनी कुलर्सची दुरुस्ती जसे जुन्या डेझर्ट कुलर्सना प्रायमर देणे, आवश्यकता असल्यास कलरिंग करणे कुलर्समध्ये वुडवुल भरणे, आवश्यकता भासल्यास स्विच दुरुस्ती, नविन स्विच लावणे, मोटारपंप बदलविणे, कॅपसिटर, वायर बदलविणे, आवश्यकता भासल्यास टाकी बदलविणे, आईलींग, ग्रिसींग व वेल्डींग करणे इत्यादी किरकोळ दुरुस्तीची कामे करावी सिंफनी कुलर्समध्ये वुडवुल भरणे, आवश्यक दुरूस्ती करणे व ऑईलींग, ग्रिसींग इत्यादी कामे करणे आवश्यक आहे, सदरहू दुरुस्ती १० दिवसांचे आंत करणे आवश्यक आहे.

२. कुलर्सची दुरुस्ती झाल्यानंतर पुढील ०४ महिन्यांमध्ये सदरहू कुलर्समध्ये पुन्हा बिघाड निर्माण झाल्यास विनामुल्य दुरुस्ती करुन द्यावी लागेल.

३. उपरोक्त कालावधीमध्ये सदरहू कुलर्स संबंधी बिघाडाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास तक्रारींचे निवारण ताबडतोब करुन द्यावे लागेल.

४. दरपत्रक (निवीदा) भरतांना प्रत्येक दुरूस्ती व त्यासाठी येणारा खर्च वेगळा दर्शविण्यात यावा तसेच डेझर्ट कुलर व सिम्फनी कुलरचा सर्व्हिंगचा वूडवूल भरणेचा प्रति कूलर खर्च हा वेगवेगळा दर्शविण्यांत यावा दर हे सर्व करांसह सादर करण्यात यावेत.

५. कुलर्स दुरुस्तीनंतर दुरुस्तीचे देयक द्विप्रतीत सादर करुन देयक अदायगी करणेकरीता सी.एम. पी. आवश्यक नसल्यास आवश्यक असणारे कागदपत्रांची पूर्तता करावी लागेल ज्यामध्ये एक रद्द केलेला मुळ धनादेश, पॅन कार्ड, आधार कार्ड ची झेरॉक्स सादर करावी.

तरी आपण आपल्या मोहोर बंद दरपत्रक/निवीदा **दिनांक २०/०३/२०२६** किंवा त्यापूर्वी **वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अकोला** या नावांनी या कार्यालयास सादर करव्यात. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा (निवीदा) विचार केला जाणारा नाही याची नोंद घ्यावी.

(दरपत्रकाचे (निवीदा) बंद लिफाफ्यावर कुलर्स दुरुस्ती बाबत निवीदा असे नमुद करावे.)

अकोला

दिनांकः— ११/०३/२०२६.

आदेशान्वये,

अधिक्षक

वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला.